# प्रकरण ५ वे

## श्री. ना. पेंडसे यांची 'लेखनशैली'

# प्रकरण ५ वे
# श्री. ना. पेंडसे यांची लेखनशैली

पेंडसे यांच्या शैलीमध्ये वेगळीच अभिजातता आहे. ती अतिशय साधी सरळ व अनौपचारिक आहे. तीत सहज संवादाचा जिव्हाळा व गोडवा आहे. त्या साधेपणातही अभिव्यक्तीचे सामर्थ्य भरपूर आहे. ती प्रसंगाचा दृकप्रत्यय देऊ शकते, निसर्गदृश्ये उभी करू शकते[१]. म्हणून त्यांच्या कादंब-या प्रसिध्द झाल्या तेव्हा त्याच्या प्रादेशिकतेबरोबर त्यांच्या लेखनशैलीचेही भरपूर कौतुक झाले.

पेंडसे यांनी 'गारंबीच्या बापू' मध्ये आकर्षक आरंभ करून, उत्कंठा वाढवीत नेण्याऐवजी ती आधीच तृप्त करून टाकली आहे.[२] कारण वेळोवेळी घडणा-या बाबी ते आधीच सांगत गेलेले आहेत. कादंबरीत गुंतागुत निर्माण करण्याऐवजी आधीच त्याची उकल करीत गेलेले आहेत. उदा अगदी शेवटचे प्रकरण जरी घेतले तरी त्यात हा प्रकार दिसून येतो. बापूची महत्वकांक्षा सरपंच होण्याची असते परंतू क्रमाने एक डाव त्याच्या विरोधी जात असतो. बापू सरपंच पदाच्या लढयातून माघार घेण्यापर्यंत येतो. परंतू शेवटी बापू सरपंच होतो आण्णा खोतच त्याचे नाव सुचवतात. ही पध्दत म्हणजे उत्कंठा वाढवीत नेण्याची नव्हे काय? हे त्यांच्या लेखनाचे कौशल्य आपल्याला यातून जाणवते.

पेंडसे यांच्या 'गारंबीच्या बापू' कांदबरीतील मुलायम शैलीमुळे व त्यांच्या विशिष्ठ निवेदन पध्दतीमुळे जर मुख्य अडचण होत असेल तर ती ही, की वास्तवाचे किती भीषण दर्शन या कादंबरीत घडलेले आहे. हेच मुळी समजत नाही. एखादया अल्लड निरागस मुलीने मोठया कौतुकाने शेजारचा अमुक एक काका आज दुपारी आपल्या घरी कसा आला व त्यांने दिलेल्या खेळण्याची सोबत करीत आपण शेजारी कसे खेळत बसलो, त्याचा खाऊ किती चांगला होता व निरागसपणे कौतुकाने सांगावे तसा प्रकार या कादंबरीत घडलेला आहे. घटना त्या मुलीच्याही समोर होत्याच, तिला त्यांचे पुरते आकलन झालेले

नसते. या उत्साही या उत्साही अल्लड निवेदनामुळे जर पिताही मुलीचे कौतुक करू लागला तर सगळी मुल्य व्यवस्थाच कोलमडून जाईल येथे जे रमणीय आहे ते कडवट, भीषण व सुन्न करणा-या वास्तवाचे निवेदन करीत आहे. असा प्रकार पेंडसे यांनी आपल्या लेखनाने घडवून आणला आहे. जणू त्यांनी इंद्रधनुष्य दाखविण्यासाठी लोलक वाचकांच्या डोळयासमोर धरला आहे, आणि वाचकांना लोलकातुन दिसणारे सप्तरंगी इंद्रधनुष्य एकाच वेळी रमणीय व हिडीस दिसू लागले असे या कादंबरीचे स्वरूप आहे. तरीही तिच्या आतील आशय व अभिव्यक्तीच्या अव्दैताला कोठेही तडा गेलेला नाही. या कादंबरीतील सारे रमणीय शुद्र आणि भीषण या दोन पातळीवरील वास्तवाच्या देहावर चढलेली झळाळी आहे. वास्तविक जीवनाच्या आकलन अवलोकनात ठिक ठिकाणी असणारा भयानकाचा जबडा मराठी कादंबरीने यापूर्वी कधीही पहिला नव्हता हे त्यांच्या लेखनशैलीचे सामर्थ्य आहे.

पेंडसे यांच्या लेखनशैलीचे वैशिष्टये म्हणजे कादंबरीतील भाषा होय पेंडसे यांची भाषा स्वाभविकच तरम, मुलायम आहे. शैलीमध्ये सुजाणपणा आहे. संवेदनक्षमतेचा स्थूलपणाच्या मर्यादा आहेत. पेंडसे यांच्या शैलीत अकृतित्रमतेचे माधुर्य, निरोगीपणाची स्वाभविक मुलायम कांती, जिवत सौंदर्याचा सहज टवटवीतपणा आहे. या शैलीचा सुजानपणा हे तिचे सामर्थ्य मानले तर संवेदनक्षमतेचा स्थूलपणा ही तिची मर्यादा होती.

पेंडसे यांच्या लेखनात तडजोड फार वाटते. उदा- 'गारंबीचा बापू,' ही कादंबरी व्यक्तीचित्रणात्मक असली या कादंबरीचा नायक 'बापू'च आहे. 'गारंबी' बापूला आपला मानत नसली तरी बापूने गारंबीतील लोकांना आपले करून घेण्यात बरेच प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्यासाठी अनेक सोई-सुविधा केलेल्या आहेत. हा आडदांड बापू त्या कादंबरीचा नायक होणे म्हणजे ही त्यांच्या लेखनाची तडजोडच आहे.

'गारंबीचा बापू' व 'गारंबीची राधा' या प्रादेशिक कादंब-या वाचत असताना तो प्रदेश जसाच्या तसा उभा करण्याचे समार्थ्य त्यांच्या लेखनामध्ये आहे. पेंडसेची प्रादेशिकता वाचकांना सरळ भिडते त्यांचा निसर्ग अंधातरी वावरत नाही. उदा- गारंबीचा पाठ जरी

घेतला तरी नुसता पाठ येणार नाही. तर त्या पाठाच्या असापास गुरव असतील, ब्राम्हण असतील, त्या पाठाच्या पाण्यावरून त्या दोघांच्यात मारामा-या असतील. बोंडलाच्या विहीरीतील पाण्याचा पाचकळपणा, गारंबीचा लाल रस्ता, आजूबाजूला असणारे हिरवेगार वृक्ष, 'वणदी' नदी, तिच्या मार्गात असणा-या प्रचंड शिळा, छोटया-छोटया द-या, दुर्गेश्वराची दाट झाडी, समोर पसरलेला अथांग सागर, हे दृश्य कल्पना नसताना समोर येते. दाट माडांची हिरवळ आणि त्या हिरवळीतून डोकावणारी मंगलोरी कौलाची घर दोन अडीच मैल सरळ रेषेत गेलेला समुद्र किनारा, समुद्रात घुसलेली हर्णेची बत्ती, लांब सुरूची गर्द झाडी. निसर्गाने जणू आपल्या वैभवाचे प्रदर्शनच मांडले होते. त्यांनी कोकणी माणसाची नस देखील नेमकी पकडली आहे. हे वाचत असताना वाचक अगदी भारावून जातो.

पेंडसे यांनी गारंबीच्या लोकांचे स्वभावदर्शन अत्यंत मार्मिकपणे उभे केले आहे. उदा- गारंबीतील लोकांची कंजुषपणाची वृत्ती, एखादी शिल्लक गोष्ट अगदी मोठी आव आणून सांगणे, अगदी छोटया-छोटया कारणावरून एकमेकांची डोकी फोडायला हे लोक तयार असत, त्यांचा खव्वयेगिरीपणा, पैसे खर्च होतात म्हणून अगदी स्वत:साठी देखील हे लोक काहीही करायला तयार नसतात.

पेंडशाच्या लेखनात अतिशोयक्ती वाटते ती म्हणजे, गारंबीच्या लोकांची 'शेराने सोने' मोजण्याची पध्दत, व्याघ्रेश्वराचे महत्व पटवून देत असताना त्यांनी व्याघ्रेश्वराचे वर्णन, किंवा राधाचे वर्णन करीत असताना राधा तर आपल्या बुध्दी कौशल्यामुळे फारच वरचढ दाखवली आहे. राधा म्हणजे तर 'पारिजातकाचे टवटवीत फूलच' होय. किंवा यशोदा म्हणते की, आपण लहानपणी सुंदर होतो. म्हणूनच लोक आपणाकडे यायचे.

'गारंबीच्या बापू' त काही प्रकरणे अगदी सुमार आहेत. ती तीच्या लेखन शैलीमुळेच.[३] या कादंबरीत राधाने किती काव्यमय प्रवेश केला आहे. नंतर तिचा आणि बापूचा संवाद तो उतारा खालीलप्रमाणे.

'रावजी' असा मदनाचा पुतळा लागून गेला होता असा काय श्रीमंत होता. अस काय होतं रावजीमध्ये तर विठीन संतुष्ट असाव? भूक भागविण्याच यंत्र यापलीकडे तिला रावजीकडे किंमत नव्हती, पहिल्या पहिल्यान काळजी घेई नव-याची, अन्न काल्यासारखं गार झाल तरी त्याची वाट पाही. रावजी हॉटेलातच भाजी खाई आणि गांजाच्या तारेत असे शेवटी थकून बिचारी विढी बिचारी जड मनान जेवे रावजीन विढीला कधीच दुखावल नाही. तिच्यावर सत्ताही गाजवीत नसे. वास्तविक तिची केशभुषा नटण, मुरडण, आडगावातल्या गुरवाच्या बायकोला न शोभणार होत. रावजी त्यावरून तिला, बोलता रागवता तरी मोठ बिघडणार नव्हत. पण रावजींन तसे काही केले नाही त्यांच्या शरीराची भूक आदळुन, आपटून भागविली जात होती. ती भूक भागली की रावजी मोकळा तिच नटण मुरडण आपल्याला शोभते की, नाही याची विचारपुस त्यांन का करावी? गरजेच्या वाटेत जे आल ते विचारपुस त्यांन का करावी? गरजेच्या वाटेत जे आल ते तो बाजूला करी कापून काढण्याची धमक रावजीत नव्हती.

विठी तर सुशिक्षीत स्त्री होती. त्या काळात इंग्लिश तीन पुस्तक शिकलेली होती. विठी मुंबईची, तिचा बाप सधन होता. आणि सारे असून, तिच्या नशिबी रावजी आला हे किती विचीत्र, विढीच्या नशिबी सुखी संसार नव्हात म्हणून तिला दुर्बुध्दी झाली विटीची बेअब्रु झाली. स्त्रीची ती बेअब्रु! लूत आलेल कुत्र आणि ही स्त्री यांची एका मापान वासलात लावले जाते...

या उता-यातील पेंडशांची ऐटच निराळी आहे.

त्यांच्या लेखनात एक प्रकारचा जिव्हाळा आहे. माधुर्य आहे. उदा- विठोबाचे बापूवरचे असणारे प्रेम. हे प्रेम बापूने कोणत्याही अपेक्षेसाठी केलेले नाही. तर ते प्रेम अगदी निर्मळ, आधंळे प्रेम आहे किंवा दिनकर व बापू यांचे असणारे जिव्हाळयाचे संमंध, किंवा बपूची मावशीवरील निर्भय माया.

त्यांच्या लेखनात जेवढा जिव्हाळा आहेच. तेवढाच क्रोध आहे. संताप आहे. 'आण्णा खोताविषयी वाटणारा बापूला क्रोध, त्याविषयी त्यांने व्यक्त केलेला संताप, आईबद्दल बापूला वाटणारा संताप, हे किंवा आई व आण्णा खोताचे संमंध हे सारेच बापूसाठी अनाकलणीय आहे.

'गारंबीची राधा' या कादंबरीमध्ये 'पेंडसाचे लेखन' नाटयमय, कृत्रिमपणा, तडजोड पूर्ण वाटते.

'बापू' आणि 'राधा' यांची पहिली भेट घडवून आणण्यात कमालीची नाटयमयता दाखविली आहे. ती म्हणजे जेव्हा राधा पहिल्यांदा रावजीच्या हॉटेलमध्ये येते. तेव्हा बापू सिगारेट ओढीत बसलेला असतो. हया अवस्थेत राधा बापूला पाहते बापू अगदीच ओशाळून जातो. त्याला वाटते एवछया सुदंर स्त्रीने मला सिगारेट ओढताना पाहिले आणि ती, ही, आपली पहिलीच भेट होती. ही नाटयमयता खोटी वाटत नाही.

राधा ही या कादंबरीची नायिका आहे परंतु, पेंडशानी राधाला फारच 'स्मार्ट' बनवलेले आहे. म्हणूनच ते आधीच सांगतात राध शिकलेली आहे. ती मुंबईची आहे. तीचे बालपण ब्राम्हणांत गेले आहे. त्यासाठी तीचे गुण व्यक्त करणारी शैली वापरली आहे.

काही वेळेला तर तिला न झेपणारे संवाद तिचेच आहेत. आपणच व्याघ्रेश्वर निर्माण केला असे ती म्हणजे, ''गांरबी म्हणजे जग नव्हे''! हे म्हणणारी राधा हे संवाद तिचेच आहेत. हे सांगण्याकरीता ते म्हणतात राधा ही बुध्दी मानी आहे. हजरजबाबी आहे. सुशिक्षीत आहे. हा त्यांच्या लेखनातील खटाटोपच आहे.

तसेच, राधेबद्दलच्या त्यांच्या लेखनात कृत्रीमता जाणवतो. त्या काळात बायका नव-याला अरेतुरे करीत नसत, परंतु, एकमेव राधाच अशी स्त्री होती की, ती बापूला अरे तुरे करीत होती. स्वतःचे विचार खरा करणारा बापू, कुणालाही न घाबरणारा बापू, पण राधाच्या पुढे त्याचे काहीही चालत नव्हते. राधा सांगल ते ऐकणारा बापू, तिच्यापुढे एक अक्षरही बोलत नव्हता. कारण तो मान्य करित होता की, राधाही आपल्यापेक्षा हुषार आहे. राधेबद्दल त्यांनी फार अतिशयोक्तीपूर्ण वर्णन केलेले आहे. रावजी मेल्यानंतर राधेची एकटे राहण्याची तयारी.

त्यांच्या लेखनात कादंबरीच्या पहिल्या प्रकरणापासून ते अगदी शेवटच्या प्रकरणापर्यंत वाचकांची उत्कठा वाढण्याचे सामर्थ्य आहे. उदा-बापूला 'साक्षात्कार' होईल का? बापू 'साक्षात्कार' होण्यासाठी लावून बसलेला समाधी? त्यासाठी कोणलाही माहित नसलेल्या गावी तो निघून गेलेला आहे. आणि तो एक दिवस परत येईल या आशेने बापूच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली राधा, परंतु बापू खरोखरच परत येईल का? किंवा, बापूला खरोखरच साक्षत्कार होईल का? हे जाणून घेण्यासाठी अगदी खरोखरच वाचक अधीर होवून वाचत जातो. अगदी शेवटच्या पानापर्यंत वाचकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे.

पेंडसे यांच्या लेखनात कादंबरीत कथानकाच्या गुंफणीत कलाकुसर प्रकट होत नसली, तरी कथाविकासात वाचकांची उत्कंठा जागृत ठेवण्याची क्षमता आहे. म्हणूनच 'गांरबीची राधा', ही एक त्यांची सुंदर कलाकृती आहे. स्वभावरेखाटनाच्या दृष्टीने विचार केला तर पेंडसे यांच्या कलेने उंच पातळी गाठली आहे. म्हणून त्यांच्या या कादंबरीत पात्रे परिपूर्ण वाटतात. त्यांच्या कांबद-यात मनोगताला जसे महत्व आहे. त्याच प्रमाणे आपण निर्माण केलेली पात्रे लोकांच्या डोळयात भरतील, लोकांना ती परिचीत वाटतील याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. 'गारंबीची राधा' या कादंब-यातील, घांगुर्डे मास्तर, त्यांच्या डिग-यासाठी प्रसिध्द असणारे. 'आपा' कधीकधी शांत, क्रोधी मायाळू असा त्यांचा स्वभाव रेखाटला आहे. किंवा 'अष्टवर्गे' या सर्वांचे चित्रण अगदी परिपूर्ण आहे.

'हद्दपार'(१९५०) या पेंडसे यांच्या दुस-या कादंबरीत या शैलीचा विकास झालेला आढळतो, तसा व्यक्ती चित्रणाच्या कौशल्याचाही राजकीय समस्या विवेचन सामाजिक विश्लेषण या कोणत्याही अध्यावत प्रवृत्तीकडे ही कथा वळत नाही. शुध्द व सूक्ष्म व्यक्तीचित्रण, हाच येथील मुलस्त्रोत आहे. व हे व्यक्तीचित्रणांचे कौशल्यदेखील मुख्यतः एकाच व्यक्तीवर केंद्रित केले आहे मराठी जिवनातील खेडयातील शिक्षक ही व्यक्ती वास्तविक नित्याच्या सर्वत्रिक परिचयाची परंतू तिच्या अंतरंगात गिरण्याची इच्छा किंवा तिच्या सामाजिक महंतीची जाणिव अलीकडेच पाच सात वर्षात दिसून येते.

या कथेतील अंतरिक जीवनमुल्ये व प्रत्यक्ष घटना यांचे परस्परप्रमाण देखोल नित्याहून वेगळे आहे. अवास्तव आहे असे म्हणता येत नाही. त्या अंतिरंगीततेचा वास येणे शक्य आहे. परंतु येथे लेखकाच्या कल्पनेने अंर्तमुल्यांचा केंद्रबिंदुवरून या घटना प्रक्षेपित केल्या आहेत. अशा प्रक्षेपणात त्यांच्या प्रमाणांचा विस्तार झाला आहे. करवंदयाच्या कातळावर संधिप्रकाशात दूर जाणारी राजे 'मास्तरांची मुर्ती' ही या अंतप्रक्षेपणाचे एक प्रतिक आहे.

पेंडशाच्या सर्व रेखा अधिक प्रत्ययकारी वासतवाच्या पायावर उभारलेल्या व नेमेकेपणे चित्रिलेल्या आहेत. त्यात समरसता व प्रतिति आहे. त्यांच्या पात्रांच्या अंतजीवनाच्या चित्रणांत अनुभूतीचा जिव्हाळा जाणवतो तसेच या पात्राच्या पार्श्वभूमीवर पकड व सामाजिक सबंधाची व्यापक माहिती असलेली दिसते व म्हणून पुरूषोत्तम यशवंताच्या वळणाची आत्मनिष्ठा व त्यांनी जे नाकारले ते वसतुनिष्ठेचे अनुशासन यांचा समन्वय पेंडशांच्या लेखनात होणार अशी आशा वाटू लागते.

पेंडसे यांच्या 'गारंबीच्या बापू' मध्ये या लेखनात काही क्रांतीकारक बदल वाटावा अशा अनेकांगी बदल दृष्टीस पडतो.

**बांधणी -**

त्यांच्या कांदबरीत जाणवलेला पहिला महत्वाचा घटक म्हणजे बांधणीचा होय. कलानुक्रमाने कथा सांगत जाण्याची धोपट पध्दत इथे पेंडसेची दिसत नाही. लेखक या ठिकाणी हेतुपुर:सर नवा मार्ग चोखाळीत आहे. यौवनाच्या उंब-याशी यशोदा येते. तेव्हा सगळी गारंबी तिच्या सौंदर्याने पागल होते, ती ही पागल होते. आणि शेवटी आण्णा खोताच्या वासनेला बळी पडते वैगेरे घटना रांगेने येत गेल्या असल्या तरी आपली ही नेहमीची पध्दत पेंडसे सोडायला तयार नाहीत. त्यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्व आहे. बांधणीकडे ते जाणूनबुजून वळलेले इथे दिसतात.

## संवाद -

संवाद हे पेंडसेच्या कादंब-याचे एक महत्वाचे बलस्थान आहे. त्यांच्या संवादाचा वेगळेपणा व त्यांच्या संवाद कौशल्याचा उत्कर्ष 'गारंबीच्या बपू' मध्ये आढळतो. बापू मधील संवादाकडे वाचक पहात राहिले संवादाचे असे सामर्थ्य यापूर्वी मराठी कांदबरीने कधी अनुभवले नव्हते.

या सवांदाना डोळे दिपवणारी गती असते हे संवाद सरळ आपल्या लक्ष्यावर झेप घेतात. थोडया सरावाने ते कुठे जाणार याचा अंदाज वाचकाला बांधणे येतो.

## निवेदन पध्दती -

आशय आणि बांधणी त्यांच्या कांदब-यामध्ये परस्परात इतकी विलीन झालेली मराठी कादंबरीत क्वचितच आढळतात, आरंभाला निवेदनाची प्रयस्त पध्दत आहे असे वाटते पेंडसे हे त्यांच्या लेखनात प्रतिभा वापरताना फारसे दिसत नाहीत. त्यांची 'गारंबीची बापू' आणि 'गारंबीची राधा' या दोन कादंब-यामध्ये देखील त्यांची निवेदन पध्दती साधी सरळ वाटते.

पेंडसे यांनी आपल्या लेखनात कधी-कधी उपमा देखील वापरलेल्या दिसून येतात.

उदा- 'बापू' आणि 'दिनकर' या दोघांची मैत्री म्हणजे 'वाघ शेळीची' मैत्री होय असे बापू म्हणतो. किंवा निसर्गाच वर्णन करताना, अशा प्रकारचा हा निसर्ग सगळीकडे हिरवगांर जशी काही हिरवी चादरच आहे.

पेंडशाच्या लेखनात शब्दावरील पकड कायम ठेवण्याचे सामर्थ्य आहे. किंवा त्यांच्या कादंबरीतील नायक-नायिका कुठेही डगमगलेल्या नाहीत. उदा- महत्वाकांशी बापू, बुध्दीमानी राधा, राधाला त्यांनी कुठेही तडा जावून दिलेला नाही. सगळया गारंबीने तिच्या व बापूच्या प्रेमलाा नाकारले परंतु तिला त्यांनी कधी खचलेली दाखवलेली नाही. उलट तिच्यात परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य होते. व देत राहिली. तसेच कितीही संकट आली तरी

बापू त्या संकटांना तोंड देत गेला त्याच श्रीमत होण्याच स्वप्न त्यांन पुर केल. व 'सरपंच' ही झाला.

'गारंबीचा बापू' व 'गांरबीची राधा' या दोन कादंब-या प्रसिध्द झाल्या त्यात वरील सर्व घटकांचा वाटा असला तरी लेखनशैलीचा फार मोठा वाटा आहे.

## समारोप -

पेंडसे यांच्या लेखनामध्ये आशय, बांधणी, संवाद, निवेदन शैली, शब्दांचा हव्यास यामुळे पेंडसे यांची लेखनशैली परिपूर्ण वाटते त्यांच्या लेखनशैलीमध्ये वेगळाच गोडवा आहे. कळी उमलते तरी कादंबरी अपरिहार्यतेने विकसित होत जावी, यावर त्यांचा कटाक्ष होता. पेंडसेच्या बाबतीत अतिशय महत्वाची गोष्ट अशी की, प्रत्येक कादंबरीबरोबर ते काहीतरी शिकत गेले त्याही पेक्षा महत्वाचे असे की, ते स्वतःच, स्वतःचे शिक्षक होते. पेंडसेंच्या निवेदनाची किमया अशी की, माणसांचे वर्णन न कळताही वाचकांच्यापुढे स्वच्छ उभी राहतात. पेंडसेनी त्या काळात मराठी कादंबरी साहित्यात जे स्थान मिळवले ते अनन्य साधारण होते.

संदर्भ टीपा-

१- प्रा. कुसुमावती देशपांडे, मराठी कादंबरी, पहिले शतक १८५०-१९५०, भाग दुसरा, पृष्ठ कं - १९१

२- नरहर कुरूंदकर, धार आणि काठ पृष्ठ कं -१८७

३- श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन २२८, वि.पु. भागवत मौज प्रकाशन गृह खटाववाडी, मुंबई ४०० ००४, आवृत्ती पहिली, पृष्ठ कं- ४५०